# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## Maharashtra Prathamik Shikshan Parishad

(Govt. of Maharashtra Undertaking)

जा.क्र.मप्राशिप/सशिअ/गणवेश/२०१७-१८/५०४ दिनांक : 18 MAR 2017

*प्राधान्याने / अतितात्काळ / महत्वाचे*

प्रति,

१) आयुक्त,
महानगरपालिका (सर्व).

२) मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व).

विषय: सन २०१७-१८ मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत गणवेश योजनेच्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक बचत खात्यात रक्कम वर्ग करणेबाबत.

संदर्भ: १) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक:डिसीटी२३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७,दिनांक ०५ डिसेंबर २०१६.
२)दि.०९ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळ (PAB) च्या बैठकीत मिळालेल्या तत्वत: मंजूरीनुसार.

सर्व शिक्षा अभियान सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी च्या लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देणेबाबत भारत सरकारकडून **३७,६२,०२७** लाभार्थ्यांकरीता रु.**१५०४८.१०८** इतकी तरतूद तत्वत: मंजूर करण्यात आली आहे. सदर योजनेच्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक बचत खात्यात रक्कम वर्ग करण्याबाबतची कार्यवाही शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन होणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

सदर मार्गदर्शक सूचनांनुसार तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत : वरीलप्रमाणे.

(नंद कुमार भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक
म.प्रा.शि.प.,मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव :-

१) शिक्षण संचालक (प्राथमिक ), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
३) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, सर्व.
४) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सर्व.
५) शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी/ शिक्षण प्रमुख, महानगरपालिका , सर्व.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा. मंत्री महोदय, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
३) मा.आयुक्त, शिक्षण ,महाराष्ट्र राज्य,पुणे.



सर्व शिक्षा अभियान

# सर्व शिक्षा अभियानांतर्गत गणवेश योजना, मार्गदर्शक सूचना - सन २०१७-१८.

प्रास्ताविक : -

सर्व शिक्षा अभियान सन २०१७-१८ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळ (PAB) ने दि.९ फेब्रुवारी,२०१७ रोजीच्या बैठकीत तत्वत:मंजूरी दिलेली आहे. इयत्ता.१ ली ते ८ वी मधील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती/जमाती मुले, तसेच दारिद्रय रेषेखालील सर्व संवर्गातील पालकांची मुले यांना सदर योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

सन २०१७-१८ मध्ये मोफत गणवेश योजनेकरीता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत **३७,६२,०२७** लाभार्थ्यांसाठी रु.**१५०४८.१०८** लक्ष तरतूदीस भारत सरकारची तत्वत: मंजूरी मिळाली आहे. यात राज्य शासनाच्या गणवेश योजनेतील लाभार्थी विद्यार्थ्यांचा समावेश नाही. प्रती गणवेश संच **२००/-** रु.या दराने दोन गणवेश संचाकरीता **रु.४००/-** या प्रमाणे रु. १५०४८.१०८ लक्ष इतकी तरतूद मंजूर आहे.

**गणवेश योजना कार्यवाही प्रक्रिया:**

१) मोफत गणवेश वितरणाबाबतची कार्यवाही शाळा सुरु होण्यापूर्वी करावयाची असल्याने जे पात्र लाभार्थी विद्यार्थी आहेत. त्यांच्या पालकांची बैठक आयोजित करण्यात यावी. सदर बैठकीत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना Sarva Shiksha Abhiyan, **FRAMEWORK FOR IMPLEMENTATION** मधील Appendix-1 मध्ये मुद्दा क्र.9.f नुसार. Nationalized/Scheduled/Gramin Bank अथवा Post Office मध्ये संयुक्त बचत बँकखाती स्वत: पाल्य व त्याच्या आईच्या नावे उघडण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. ज्या लाभार्थ्यांची आई हयात नसल्यास त्यांचे इतर पालक/अभिभावक यांचे नावे संयुक्त बँक खाती उघडण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. सदर योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक अनिवार्य आहे.याबाबतची माहिती पालकांना देण्यात यावी.बँक खाते आधार क्रमांक संलग्न असणाऱ्या बँकेतच उघडण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

२) मोफत गणवेशाचा रंग, प्रकार, याबाबी संदर्भातील निर्णय संबंधित शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन घेण्यात यावा, व त्यानुसार पालकांना गणवेश खरेदीबाबतच्या सूचना द्याव्यात.

३) गणवेश योजनेचा निधी राज्य स्तरावरुन जिल्हा स्तरावर वर्ग करण्यात येईल.जिल्हा स्तरावर निधी उपलब्ध होताच थेट संबंधित शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर निधी जमा करण्यात यावा.शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव घेऊन समितीच्या मान्यतेने सदर तरतूद खर्च करावयाची आहे.

४) गणवेश पात्र लाभार्थ्यांच्या पालकांनी स्वत: आपल्या पाल्यास दोन गणवेश संच खरेदीकरुन, खरेदी केलेल्या पावत्या (देयकं) संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे.

५) सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून गणवेशाच्या देयकांचे संकलन दि.३० जून २०१७ पर्यंत करून त्यानुसार लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर निकषानुसार मंजूर असलेली प्रती गणवेश संच रु.२००/- या प्रमाणे दोन गणवेश संचाची रक्कम रु.४००/- इतका निधी वर्ग करावा.

६) सन २०१७-१८ मध्ये संभाव्य नव्याने प्रवेशित होणारे गणवेश पात्र लाभार्थ्यांची माहिती असल्यास त्यांचे बँक खाते उघडण्याबाबतच्या सूचना पालकांना देण्यात याव्यात.इयत्ता १ ली च्या वर्गात नव्याने दाखल होणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांचा निधी व शाळेत नव्याने प्रवेश घेतलेले निकष पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचा निधी शाळा सुरू झाल्यापासून एका महिन्याचे आत रोख स्वरुपात स्वत: पाल्य व त्याच्या आईच्या नावे बँक बचत खात्यात वर्ग करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत** : जिल्हा /मनपा निहाय भौतिक व आर्थिक तरतूदीबाबतचे प्रपत्र.

**(नंद कुमार** भा.प्र.से.)
**राज्य प्रकल्प संचालक**
**म.प्रा.शि.प.,मुंबई.**